पंचांग

- गुरुवार, दिनांक १३ जून २०२४

- ज्येष्ठ शु. ७, श्री शके १९४६
- विक्रम संवत २०७९, क्रोधीनाम संवत्सर, उत्तरायण, वसंत ऋतू.
- झाशीची राणी लक्ष्मीबाई पुण्यतिथी (तिथीप्रमाणे), शुभ दिवस
- नक्षत्र : पूर्वा, योग : व्रज, करण : गरज
- सूर्योदय : ०६.०३ वा., सूर्यास्त : ०६.३० वा.
- राहु काल : दुपारी १:३० ते ३:००

राशिभविष्य

मेष : नवीन काही तरी शिकायला मिळेल, त्याच फायदा होऊन बढती मिळेल.

वृषभ : वादावादीचे प्रसंग उद्भवतील. इतरांची मते जाणून वाद मिटवा.

मिथुन : आत्यत्मा अनिष्ठ ढकलते जाईल, त्याच्या मोहात न पडणे उत्तम.

कर्क : महत्त्वाच्या जबाबदाऱ्या पार पाडाव्या लागतील.

सिंह : इतरांच्या भरवशावर काम सोपवू नये. पदरात निराशा पडेल.

कन्या : अतिउत्साहाच्या भरात केलेल्या कामामुळे तोटा होईल.

तुळ : सकारात्मक विचारांमुळे कठीण कामे होऊन जातील.

वृश्चिक : भागिदारीत काही गोष्टी मनाविरुद्ध घडतील.

धनु : द्विधा मन:स्थिती निर्माण होईल. निर्णय घेणे अवघड होईल.

मकर : गर्दीमध्ये जाण्याचा मोह टाळा, दगदग होईल.

कुंभ : संततीबाबतची चांगली बातमी कानावर येईल.

मीन : छुपे शत्रू पुन्हा डोकावल्याने ताणतणाव वाढेल.

व्यक्तिविशेष | आचार्य प्र. के. अत्रे

लेखणी आणि वाणी यांच्या साहाय्याने अर्धशतकाहून अधिक काळ संपूर्ण महाराष्ट्र ढवळून काढणारे व्यक्तिमत्व म्हणून आचार्य प्रल्हाद केशव अत्रे यांची ओळख आहे. कवी, लेखक, नाटककार, विनोदकार, चित्रपटकथा लेखक, वृत्तपत्रकार, संपादक, प्रभावी वक्ते, वादविवादपटू, शिक्षणतज्ज्ञ, अस्सल मराठी बाजाचे खुमासदार लेखन करणारे सव्यसाची लेखक म्हणून अत्रे यांची प्रभावशाली कारकीर्द घडली. अत्रे यांचा जन्म १३ ऑगस्ट १८९८ ला पुणे जिल्ह्यातील सासवडजवळच्या कऱ्हा नदीच्या काठावर वसलेल्या कोडीत या गावी झाला. १९११ साली पुढील शिक्षणासाठी ते पुण्यात आले. त्या काळात कला, विद्या, आणि ज्ञान यांचं माहेरघर असलेल्या पुण्याने अत्र्यांच्या व्यक्तिमत्वाला खऱ्या अर्थाने आकार दिला. १९२१ नंतर त्यांनी 'केशवकुमार' या नावाने कविता लिहायला सुरुवात केली. 'झेंडूची फुले' (१९२५) हा विडंबनपर कवितांचा संग्रह प्रसिद्ध झाला. विडंबन कविता मराठीत आणायचं श्रेय अत्रे यांनाच दिलं जातं. महाविद्यालयीन काळातच राम गणेश गडकरी या थोर नाटककाराचा सहवास त्यांना लाभल्यामुळे त्यांना नाट्यलेखनकलेचं रहस्यही उमगलं. १९३३ साली अत्र्यांनी 'साष्टांग नमस्कार' हे नाटक लिहिलं. पुढच्या काळात त्यांनी उलटून-पालटून विनोदी, प्रहसनात्मक, गंभीर नाटकं लिहिली. घराबाहेर, उद्याचा संसार, पराचा कावळा, वन्दे मातरम, मी उभा आहे, जग काय म्हणेल, पाणिग्रहण, कवडीचुंबक, आणि शेवटच्या काळात (१९६२ ते १९६९) तो मी नव्हेच, मोरूची मावशी, बुवा तेथे बाया, मी मंत्री झालो, डॉक्टर लागू, प्रीतिसंगम, ब्रह्मचारी ही त्यांची नाटकं रंगभूमीवर आली व लोकप्रिय ठरली. नाटकांच्या बरोबरीने त्यांनी विनोदी लेखनही भरपूर केलं. साने गुरुजींच्या कादंबरीवर आधारित असलेल्या 'श्यामची आई' या चित्रपटाला १९५४ मध्ये राष्ट्रपतींचं पहिलं सुवर्णपदक, तर 'महात्मा फुले' या चित्रपटाला १९५५ मध्ये रौप्यपदक देऊन गौरवण्यात आले. शिक्षण, पत्रकारिता, चित्रपटनिर्मिती, दिग्दर्शन, राजकारण, समाजकारण अशा विविध क्षेत्रांत ज्यांनी आपल्या असामान्य कर्तृत्वाने अमिट असा ठसा उमटवला. अशा आचार्य प्र. के. अत्रे यांचे १३ जून १९६९ रोजी मुंबईत निधन झाले.

(पान १ वरून)

कुवेतमध्ये ४१ भारतीय...

मंगाफ भागातील ६ मजले उंच इमारतीत ही आग लागली. या इमारतीमधील स्वयंपाक घरातून आगीने पेट घेतला. त्यानंतर ही आग सर्वत्र भडकली. या इमारतीत १६० जण राहत होते. हे सर्वजण एका कंपनीत काम करत होते. त्यांच्या निवासाची सोय या इमारतीत करण्यात आली होती. दुर्दैवाने आज सकाळी लागलेल्या भीषण आगीत ४३ जणांचा मृत्यू झाला असून ३० जण जखमी आहेत.

आगीच्या घटनेवर परराष्ट्रमंत्री डॉ. एस. जयशंकर यांनीही ट्विट करून शोक व्यक्त केला. आगीच्या घटनेने दुःख झाले आहे. या दुर्घटनेत ४० पेक्षा जास्त नागरिकांचा मृत्यू झाला असून ५० पेक्षा जास्त जखमी असल्याची माहिती आहे. जखमींना रुग्णालयात दाखल करण्यात आले. याशिवाय आपले राजदूत रुग्णालयात पोहोचले आहेत. पीडित कुटुंबीयांप्रती माझ्या सहवेदना आहेत तर जखमींना लवकरात लवकर बरे करण्यासाठी प्रयत्न सुरू आहेत, असेही जयशंकर म्हणाले. दरम्यान, दुतावास विभागाकडून दुर्घटनेतील नागरिकांना सर्वतोपरी सहकार्य करण्यात येईल, असेही जयशंकर म्हणाले.

आघाडीतील वाद मिटला...

मतदारसंघाचे प्रतिनिधित्व केलेल्या माजी मंत्री दीपक सावंत यांना उमेदवारी दिली होती. मात्र, भाजपने आपला आग्रह कायम ठेवल्याने शिंदे गटाला सावंत यांचा अर्ज मागे घ्यावा लागला. त्यामुळे येथे थेट लढत होणार आहे. कोकण पदवीधरमध्ये भाजपचे निरंजन डावखरे यांच्यासाठी शिंदे गटाच्या संजय मोरे यांना माघार घ्यावी लागली. कोकण पदवीधरमधून शिवसेना उद्धव ठाकरे गटाच्या किशोर जैन यांनी तर राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या अमित सरैया यांनी माघार घेतल्याने तिथे निरंजन डावखरे विरुद्ध काँग्रेसच्या रमेश कीर यांची प्रमुख लढत होणार आहे.

कोकण पदवीधरमधून १२ उमेदवारांनी माघार घेतल्याने येथे आता १३ उमेदवार रिंगणात आहेत. मुंबई विभागीय शिक्षक मतदारसंघात अजित पवार गटाने शिवाजीराव नलावडे यांची उमेदवारी कायम ठेवली आहे. त्यामुळे येथे भाजपचे शिवनाथ दराडे, शिवसेना उद्धव ठाकरे गटाचे ज. मो. अभ्यंकर आणि समाजवादी गणराज्य पक्षाचे सुभाष मोरे यांच्यात लढत होईल. मुंबई शिक्षकमधून काँग्रेसच्या प्रकाश सोनवणे यांनी माघार घेतली. नाशिक विभागीय शिक्षक मतदारसंघातून एकूण १६ उमेदवारांनी आपले अर्ज मागे घेतले.

जरांगेंची प्रकृती खालावली...

नवनिर्वाचित खासदार संजय जाधव यांनी राज्यपालांना पत्र लिहून महाराष्ट्र सरकारला सूचना देण्याची विनंती केली तर काँग्रेसचे आमदार सुरेश वरपूडकर यांनीही राज्यपालांकडे ही विनंती केली.

तसेच राष्ट्रवादीचे आमदार बाबाजानी दुर्रानी यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना पत्र लिहून मराठा आरक्षणाचा प्रश्न सोडवावी, अशी मागणी केली आहे. भाजपवरील नाराजी आपल्यावर येऊ नये, यासाठी महाविकास आघाडीच्या खासदार, आमदारांनी राज्यपालांसह मुख्यमंत्र्यांना पत्र लिहून यावर तोडगा काढण्याची विनंती केली आहे.

शरद पवार गटात धुसफूस?

जयंत पाटील विरुद्ध रोहित पवार? श्रेयवादावरून समर्थकांमध्ये जुंपली

पुणे : प्रतिनिधी

नुकत्याच झालेल्या लोकसभा निवडणुकीत महाराष्ट्रातील मतदारांनी महायुतीच्या विरोधात आणि महाविकास आघाडीच्या बाजूने आपला कौल दिला. त्यातही राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाची कामगिरी अधिक उजवी ठरली. पक्षाने १० पैकी ८ जागा जिंकत इतर पक्षांपेक्षा चांगला स्ट्राईक रेट असल्याचे दाखवून दिले. १० जून रोजी पक्षाच्या वर्धापनदिनाच्या निमित्ताने झालेल्या भाषणातून आता श्रेयवादाचे राजकारण होत असल्याचे समोर आले आहे. तसेच पक्षात प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील आणि आमदार रोहित पवार यांच्यात गट पडल्याचे त्यांच्या कार्यकर्त्यांच्या सोशल मीडिया पोस्टवरून दिसून येत आहे.

दरम्यान, राष्ट्रवादीच्या चांगल्या कामगिरीनंतर पक्षाच्या मुख्यालयाबाहेर काही कार्यकर्त्यांनी जयंत पाटील 'किंगमेकर' ठरल्याचे बॅनर लावले. या बॅनरवरून पक्षातील काही नेत्यांमध्ये नाराजी असल्याचे दिसून आले. १० जून रोजी अहमदनगर येथे पक्षाचा २५ वा वर्धापनदिन साजरा करण्यात आला. यावेळी रोहित पवार यांनी राष्ट्रवादीच्या विजयाचे श्रेय हे शरद पवार आणि सर्व कार्यकर्त्यांच्या एकत्रित मेहनतीचे फळ असल्याचे सांगितले. रोहित पवार आपल्या भाषणात म्हणाले, पुढील काळात कुणी स्वतःला किंगमेकर म्हणवून घेईल. पण हा विजय कुणा एका नेत्यामुळे झालेला नसून सामान्य कार्यकर्त्यांच्या मेहनतीमुळे पक्षाला घवघवीत यश मिळाले. तसेच शरद पवार यांनी या वयात ज्या ताकदीने प्रचार केला, त्याचेही आपल्याला कौतुक करावे लागेल.

शरद पवार गटाचे प्रवक्ते विकास लवांडे यांनी ६ जून रोजी एक्सवर एक पोस्ट टाकून पक्षाच्या प्रदेशाध्यक्षपदी शशिकांत शिंदे किंवा रोहित पवार यांची नियुक्ती करावी, अशी मागणी केली होती. या मागणीने निश्चित कारण काय? याबद्दल त्यांनी कोणतेही सूतोवाच केले नव्हते. या पोस्टरवर उलटसुलट प्रतिक्रिया आल्यानंतर त्यांनी पुन्हा त्यावर रिप्लाय देत, हे माझे वैयक्तिक मत असल्याचा खुलासा केला.

विकास लवांडे यांच्या पोस्टनंतर पक्षाचे तरुण प्रवक्ते आणि जयंत पाटील यांच्याशी जवळीक असलेल्या ॲड. भूषण राऊत यांनीही एक पोस्ट टाकून प्रदेशाध्यक्षपदावर दावा करणाऱ्यांना टोला लगावला. राष्ट्रवादीचे प्रदेशाध्यक्षपद सांभाळणे कोंबड्या पाळण्याइतके सोपे नाही', असा खरमरीत टोला भूषण राऊत यांनी पक्षांतर्गत विरोधकांना लगावला. यामुळे राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षात धुसफूस असल्याचे चित्र समोर आले आहे.

राष्ट्रवादीच्या दोन प्रवक्त्यांमध्ये सुरू असलेल्या या सोशल मीडिया द्वंद्वानंतर अजित पवार गटाकडूनही प्रतिक्रिया देण्यात आली आहे.

अजित पवार गटाचे युवा नेते आशिष मेटे यांनी एक्सवर पोस्ट टाकून शरद पवार गटाला टोला लगावला. 'भूषण हे जयंत पाटील साहेबांचे एकदम जवळचे व्यक्ती आणि सोबत पक्षाचे प्रवक्ते पण आहेत. पक्षात सारं काही आलबेल नाही हे पक्षाच्या प्रवक्त्याच्या एका ट्वीटने जगासमोर आले आहे. जयंत पाटील-रोहित पवार या संघर्षात आता प्रवक्ते पक्षाची अधिकृत भूमिका मांडून हा वाद आहे हेच अधोरेखित करत आहेत'' अशी टीका आशिष मेटे यांनी केली.

जाहीररीत्या बोलणे टाळा : जयंत पाटील

पक्षातील अंतर्गत दुफळीबाबत प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांनी वर्धापनदिनी भाष्य केले होते. राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्षाचे आठ खासदार निवडून येणे, हे टीम वर्क आहे. आपल्याला टीम म्हणूनच राहिले पाहिजे. त्यामुळे चूक होत असेल तर कानात सांगा, जाहीररीत्या सांगू नका, असे म्हणत त्यांनी पक्षातील पदाधिकाऱ्यांचे कान टोचले.

सलमानच्या घरावरील गोळीबाराच्या कटात संभाजीनगरचा तरुण

संभाजीनगर : अभिनेता सलमान खान याच्या घरावर काही दिवसांपूर्वी गोळीबारासोबतच त्याच्या पनवेल फार्महाऊसवर हल्ला करून जिवे ठार मारण्याचा कट होता. या कटात शहरातील जालाननगरचा रहिवासी वसी मोहम्मद ऊर्फ वसीम चिकना याचाही सहभाग होता. त्याच्यावर हल्ल्यासाठी शस्त्रांची तस्करी करण्याची जबाबदारी देण्यात आल्याचे आता मुंबई पोलिसांच्या तपासात निष्पन्न झाले आहे.

मुंबई पोलिसांनी ६ संशयितांना हरियाणा, पंजाब, राजस्थानमधून अटक केली. यात प्रामुख्याने सोनू सुभाष चंदर, अनुज थापन यांनी हल्लेखोरांना ४० काडतुसे पुरवली होती. हे दोघेही बिश्णोई गँगचे सदस्य आहेत. त्यांनी सागर पाल यास ४ मॅगझिन व ४० काडतुसे पुरवली होती. त्यापैकी ५ गोळ्या सलमानच्या घरावर झाडण्यात आल्या होत्या. या आरोपींच्या चौकशीत त्याच्या फार्म हाऊसवरदेखील हल्ल्याचा कट रचल्याचे निष्पन्न झाले. त्यामध्ये पनवेल पोलिसांनी वसीम चिकनासह धनंजय सिंग तापेसिंग, अजय कश्यप, गौरव भाटिया, एलियास नखवी, झिशान खान, जावेद खान यांना अटक केली.

एमआयडीसीमधील इंडो अमीन्स कंपनीला आग

डोंबिवली पुन्हा हादरली

मुंबई : प्रतिनिधी

डोंबिवली पुन्हा हादरली असून येथील एमआयडीसीमधील इंडो अमीन्स कंपनीला आग लागली आहे. ही आग इतकी भीषण आहे की, आगीचे लोट दूरपर्यंत पसरले असून, शेजारील कंपन्यांनाही आगीने कवेत घेतले आहे. यासोबतच आग लागलेल्या ठिकाणी स्फोटाचे आवाज येत असून स्थानिक नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण पसरले आहे. दरम्यान, आगीची माहिती मिळताच अग्निशमनच्या पाच ते सहा गाड्या घटनास्थळी दाखल झाल्या असून आगीवर नियंत्रण मिळवण्याचा प्रयत्न सुरू आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, डोंबिवलीतील फेज २ एमआयडीसीमधील इंडो अमीन्स कंपनीला आज सकाळी आग लागली आहे. आग लागलेल्या कंपनीच्या शेजारी अभिनव शाळा आहे. यामुळे नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण आहे. दरम्यान शाळेतील विद्यार्थ्यांना घरी पाठवले असल्याचे सांगण्यात येत आहे. काही दिवसांपूर्वीच येथील एका कंपनीला आग लागून १७ जणांचा मृत्यू झाला होता. यानंतर बुधवारी पुन्हा अशाच प्रकारची आगीची दुर्घटना घडल्यामुळे प्रशासनाचा भोंगळ कारभार चव्हाट्यावर आला आहे. बचाव पथकाच्या अधिकाऱ्यांच्या म्हणण्यानुसार, आग लागलेल्या कंपनीच्या आजूबाजूला असलेल्या कंपनीतील कामगारांना आणि स्थानिक लोकांना सुरक्षित ठिकाणी हलवण्यात आले असून आगीमध्ये सुदैवाने जीवित हानी झाली नसल्याचे कळले आहे.

घटनेला यंत्रणाच जबाबदार : प्रविण दरेकर

डोंबिवलीतल्या आगीची जबाबदारी कुणाची? असा प्रश्न प्रवीण दरेकर यांना विचारल्यानंतर ते म्हणाले की, ही अत्यंत दुर्दैवी घटना आहे आणि शेवटी जी यंत्रणा याबाबत जबाबदार असते तिलाच या प्रकरणात जबाबदार धरावे लागणार आहे. एमआयडीसी, फायर ब्रिगेड, इन्स्पेक्शन करणाऱ्या अथॉरिटी त्यांनी ही जबाबदारी स्वीकारली पाहिजे. हे लोक तपासणी करत नाहीत, कागदावरच हिजीट दाखवतात. असे भाजप नेते प्रविण दरेकर म्हणाले.

अपघात भासवून सासऱ्याची हत्या

'क्लास वन' अधिकारी बहीण-भावाचा कट

नागपूर : प्रतिनिधी

नागपूरमधील हिट अँड रन प्रकरण हे घातपाताचे असल्याचा उलगडा झाल्यानंतर यात अनेक धक्कादायक खुलासे होत आहेत. पुरुषोत्तम पुट्टेवार यांची २०० कोटी रुपयांच्या संपत्तीसाठी सुनेनेच हत्या घडवून आणल्याचे पोलिस तपासात उघड झाले आहे.

क्लास वन अधिकारी असणाऱ्या अर्चना पुट्टेवार हिने ड्रायव्हरला हाताशी धरून आपल्याच सासऱ्याच्या खुनाची १ कोटी रुपयांची सुपारी दिली. यामध्ये सुनेच्या अधिकारी भावाचाही हात असल्याची माहिती आता समोर येत आहे. या प्रकरणी सुनेसह तिचा भाऊ आणि इतर चौघांना अटक करण्यात आली आहे. पुरुषोत्तम पुट्टेवार यांच्या खुन प्रकरणी सहा जणांवर गुन्हा दाखल झाला आहे.

पुरुषोत्तम पुट्टेवार यांच्या हत्या प्रकरणी गडचिरोलीत नगरविकास सहायक संचालक असलेल्या अर्चना पुट्टेवार हिच्यासह चालक सार्थक बागडे, नीरज निमजे, सचिन धार्मिक यांना अटक करण्यात आली होती. यात कुणाला सुपारी दिली गेली, कोणाचा हात होता याचा शोध पोलिसांनी घेतला. पुरुषोत्तम पुट्टेवार हत्या प्रकरणात सून अर्चना पुट्टेवार हिच्या भावाचेही नाव समोर आले आहे.

महाविकास आघाडीत बिघाडी

कोल्हे - ठाकरे गट आपआपसात भिडले

पुणे : प्रतिनिधी

महाविकास आघाडीत महाबिघाडी होण्याची चिन्हे आहेत. पुण्यात महाविकास आघाडीत मंचरमध्ये बिघाडी झाल्याचे पाहायला मिळाले. शरद पवार पक्षाचे नवनिर्वाचित खासदार अमोल कोल्हे यांच्या नागरी सत्कार कार्यक्रमात ठाकरे पक्षाच्या कार्यकर्त्यांनी राडा घातला.

अमोल कोल्हेंनी देवदत्त निकम यांचा भावी आमदार म्हणून उल्लेख करताच सभेतून शिवसेना कार्यकर्त्यांनी काढता पाय घेतला. त्यानंतर कार्यकर्त्यांनी जोरदार घोषणाबाजी केली. यावेळी शिवसैनिक आणि अमोल कोल्हे यांच्यात शाब्दिक चकमक उडाली. केंद्रात अजित पवार गटाला एकही मंत्रिपद न मिळाल्यानंतर खासदार अमोल कोल्हेंनी प्रतिक्रिया व्यक्त केली आहे. शरद पवारांचा हात डोक्यावर असताना मिळणारी वागणूक आणि हात नसताना मिळणारी दिल्लीतली वागणूक ही लक्षात घ्या, अशी टीका करत कोल्हेंनी अजित पवारांना डिवचले.

प्री-पेड मीटरचा भडका

नागपूर : प्रतिनिधी

शहरात प्री-पेड मीटरच्या विरोधात चांगलाच भडका उडाला असून, बुधवारी व्हेरायटी चौकात उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा पुतळा जाळून प्री-पेड मीटर रद्द करण्याची मागणी करण्यात आली. समाजातील कुठल्या घटकाशी चर्चा न करता हुकूमशाही पद्धतीने ग्राहकांचे जुने वीज मीटर बदलवून प्री-पेड मीटर लावले जात आहेत. या माध्यमातून ग्राहकांच्या खिशातून हजारो कोटी रुपये वसूल केले जाणार आहेत. या विरोधात नागपुरात प्री-पेड इलेक्ट्रिक मीटर विरोधी नागरिक संघर्ष समितीतर्फे जनाक्रोश अभियान राबविण्यात येत आहे.

६ वर्षांच्या बालिकेवर अत्याचार करून खून

जळगाव : जामनेर तालुक्यातील केकतनिंभोरा गावातील ६ वर्षीय बालिकेवर अत्याचार करून तिचा गळा दाबून खून करण्यात आला आहे. ही घटना मंगळवार (दि. ११) रोजी रात्री ११ वाजेच्या सुमारास घडली आहे. याबाबत मिळालेली माहिती अशी की, जामनेर तालुक्यातील केकतनिंभोरा येथे ६ वर्षीय बालिका आपल्या आई-वडील, दोन बहिणी, एक भाऊ यांच्यासोबत वास्तव्याला होती. गावात राहणाऱ्या एकाने पीडित बालिकेला खाऊ देण्याचे आमिष दाखवित मंगळवार (११) रोजी सायंकाळी चिंचखेडा शिवारातील शेतात घेऊन गेला. त्या ठिकाणी पीडित मुलीवर अत्याचार केला.

अजित पवारांनी घेतली अल्पसंख्याक विभागाची बैठक

मुस्लिम आरक्षणाची शिफारस करणार?

मुंबई : प्रतिनिधी

अजित पवार गटाने आता विधानसभा निवडणुकीत अल्पसंख्याक मते मिळवण्यासाठी मोर्चेबांधणी सुरू केली आहे. त्याचाच एक भाग म्हणून मंगळवारी राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार यांच्या पक्षातील अल्पसंख्याक विभागाची बैठक पार पडली. प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे यांच्या नेतृत्वात पक्ष कार्यालयात ही बैठक तब्बल दोन तास सुरू होती. या बैठकीत अल्पसंख्याक समाजाचा गमावलेला विश्वास पुन्हा मिळवण्यासाठी काय करता येईल, याबाबतच्या मुद्यांवर मंथन झाले.

५ टक्के आरक्षण देण्याची मागणी

राष्ट्रीय लोकशाही आघाडीत घटक पक्ष असलेल्या टीडीपी पक्षाने आंध्र प्रदेश सरकारने मुस्लिम समाजाला चार टक्के आरक्षण दिले आहे. त्यामुळे राज्यात देखील मुस्लिम समाजाला शिक्षणात ५ टक्के आरक्षण मिळाले पाहिजे आणि त्यासंदर्भात उच्च न्यायालयाचा निकाल आहे, ही भूमिका अल्पसंख्याक नेत्यांनी मांडली आहे. त्यामुळे अजित पवार यांनी राज्य सरकारकडे मुस्लिम आरक्षणाचा प्रस्ताव मांडावा, अशी मागणीही या नेत्यांनी केली आहे.

ICICI Home Finance कॉर्पोरेट कार्यालय : आयसीआयसीआय होम फायनान्स कंपनी लिमिटेड, आयसीआयसीआय एचएफसी टॉवर, अंधेरी-कुर्ला रोड, अंधेरी (पूर्व), मुंबई-४०० ०५९, भारत.
शाखा कार्यालय : पहिला मजला, ऑफिस नं. १०१, प्लॉट नं. १५९, मनोहर सोम लॅण्डमार्क, समर्थनगर, औरंगाबाद-४३१ ००१

(नियम ८ (६) साठी तरतूद पहा)

खाजगी कराराच्या माध्यमातून अचल संपत्तीच्या विक्रीची सूचना

[illegible]

अ. क्र.	कर्जदार/सह-कर्जदार/ हमीदार/कायदेशीर वारस यांचे नाव/ कर्ज खाते क्र.	तारण मालमत्तेचा तपशिलासह काही असल्यास ज्ञात भार	थकीत रक्कम	राखीव किंमत इसारा अनामत रक्कम	मिळकतीच्या निरीक्षणाची तारीख आणि वेळ	लिलावाची तारीख व वेळ
(ए)	(बी)	(सी)	(डी)	(ई)	(एफ)	(जी)
१	[illegible]	[illegible]	रु. [illegible] ७ जून २०२४	रु. ८,००,०००/- रु. ८०,०००/-	२६ जून २०२४ सकाळी ११.०० दुपारी ०३.००	०४ जुलै २०२४ दुपारी [illegible]

[illegible] https://BestAuctionDeal.com [illegible]

[illegible]

[illegible] https://www.icicihfc.com/ [illegible]

दिनांक : १३ जून, २०२४
ठिकाण : औरंगाबाद

प्राधिकृत अधिकारी
आयसीआयसीआय होम फायनान्स कंपनी लिमिटेड

१९६० संस्था नोंदणी अधिनियम २१/महाराष्ट्र ८२/९१ परभणी दि. १६.१२.९१
१९५० मुंबई अधिनियम क्र. २९/एफ-११५७ परभणी दि. १७.०२.९२

प्रेरणा बहुउद्देशीय शिक्षण प्रसारक मंडळ, परभणी

ता. जि. परभणी
अध्यक्षा : सौ. यशोदा उत्तमराव राठोड
मुख्य कार्यालय : वसंतराव नाईकनगर, वसमत रोड,
परभणी-४३१ ४०१
मोबा. ८८८८४ ८७७७७/९९६०५ ६४६२२

जा.क्र. प्रे.ब.शि.प्र.मं.प./ दिनांक : १२.०६.२०२४

लिपिक पाहिजे

प्रेरणा बहुउद्देशीय शिक्षण प्रसारक मंडळ, नाईकनगर, परभणी द्वारा संचलित अहिल्यादेवी होळकर माध्यमिक विद्यालय, सिरळी, ता. वसमत, जि. हिंगोली या शाळेत सेवानिवृत्तीमुळे रिक्त असलेल्या पदावर कनिष्ठ लिपिक हे पद भरावयाचे आहे.

अनुदानित

अ. क्र.	पदनाम	शैक्षणिक पात्रता	प्रवर्ग	शेरा
१	लिपिक	कोणत्याही शाखेचा एचएससी (१२ वी)/कोणत्याही शाखेचा पदवीधर * एम. एस. सी. आय. टी. * इंग्रजी टायपिंग : ४० * मराठी टायपिंग : ३०	खुला	-

१. सदरील नेमणूक मा. शिक्षणाधिकारी (माध्य.) जिल्हा परिषद हिंगोली यांच्या मान्यतेस अधिन राहून करण्यात येईल.
२. मुलाखतीस स्वखर्चाने यावे लागेल. कोणताही भत्ता अनुज्ञेय राहणार नाही.
३. मूळ कागदपत्रांसह मुलाखतीस उपस्थित राहावे लागेल.
४. मुलाखत स्थळ : श्री छत्रपती शिवाजी प्राथमिक विद्यालय औ. व परिसर, नाईकनगर, परभणी, ता. जि. परभणी.

दिनांक : १७.०६.२०२४ वार : सोमवार
वेळ : सकाळी १०.३० वाजता

स्वाक्षरित/-
मुख्याध्यापक
अहिल्यादेवी होळकर माध्यमिक विद्यालय, सिरळी, ता. वसमत, जि. हिंगोली

स्वाक्षरित/-
सचिव/अध्यक्षा
प्रेरणा बहुउद्देशीय शिक्षण प्रसारक मंडळ, परभणी

ASUS Vivobook S 16 OLED
Asus Exclusive Store - Sigma Peripherals